भुसंपादन अर्ज क्रमांक **३६४/२०१८**
गिरीधर वि. शासन
निशाणी क्रमांक २५ **खाली**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. १ विष्णु सदाशिव कोलते यांचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्री. बी. एम. जामदारे यांच्यामार्फत सुरु**

१. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. पुराव्याकामी मी दिनांक २३.०६.२०१० रोजी पारीत झालेल्या निवाडयाची प्रमाणित प्रत मी दाखल केली असून ती **निशाणी क्रमांक ३०** वर आहे. कलम १२/२ ची नोटीसांची प्रत **निशाणी क्रमांक ३१, ३२ व ३३** वर आहे. सी. सी. फॉर्म **निशाणी क्रमांक ३४** वर आहे. गट क्रमांक ५८, ५९ व ६० या जमिनीच्या सातबारा उताऱ्याच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे **निशाणी क्रमांक ३५, ३६, ३७** वर आहेत. सर्वे क्रमांक ३०, ५९ व ६० या जमिनीचा आट अ चा खातेउतारा **निशाणी क्रमांक ३८** वर आहे. तलाठी यांचे प्रमाणपत्र **निशाणी क्रमांक ३९** वर आहे. सन २००८–०९ या वर्षीचा गट क्रमांक ५९, ६० चे सातबारा उतारे **निशाणी क्रमांक ४०, ४१** वर आहे. आठ अ उतारा **निशाणी क्रमांक ४२** वर आहे. तलाठी यांचे प्रमाणपत्र **निशाणी क्रमांक ४३** वर आहे. गट क्रमांक ५८ व ५९ च्या सातबारा उताऱ्याच्या प्रती **निशाणी क्रमांक ४४ व ४५** वर आहेत. भुसंपादन अधिकारी यांनी दिनांक ११.०७.२०१८ रोजी पाठवून दिलेल्या नोटीसची स्थळप्रत **निशाणी क्रमांक ४६** वर आहे.

**गैरअर्जदार क्रमांक २ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास अॅड एस. डी. गटकुळ यांच्याकडून**

२. भुसंपादन अधिकारी यांनी कलम ४, ६, ९ व १२ च्या नोटीसा पाठवून दिलेल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की भुसंपादन अधिकाऱ्यांनी संपादित झालेल्या जमिनीची पाहणी करण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे आहे की संपादित झालेल्या जमिनीचा मावेजा आम्हाला मिळालेला होता. साक्षीदार स्वतः सांगतो आमची हरकत कायम ठेवून रक्कम उचललेली होती. भुसंपादन अधिकारी यांच्याकडे मी रक्कम कमी मिळाली म्हणून लखी तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन कोरडवाहू होती. हे म्हणणे खरे नाही की जमिनीच्या सातबारा उताऱ्यात विहिरीची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की,

सातबारा उताऱ्यात तुर, मुग, उडीद, ज्वारी अशा नोंदी आहेत. संपादित जमिनीत आम्ही ऊस, कांदा अशी पिके घेत होतो. हे म्हणणे खरे आहे की सातबारा उताऱ्यात ऊसाची नोंद नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की रोहकल गावात पशुवैद्यकीय दवाखाना, बँक इ. सुविधा उपलब्ध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की रोहकल गावापासून साखर कारखाना अंदाजे तीस ते चाळीस कि. मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कॅनाल करिता शासनाने जमिनी संपादित केलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, कॅनालचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे जमिनीच्या किंमती वाढलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भुसंपादन अधिकारी यांनी संपादित झालेल्या जमिनीची संयुक्त मोजणी व स्थळपाहणी करुन शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार योग्य तो मावेजा दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शासनाकडून जादा नुकसान भरपाई मिळण्याकरिता मी खोटया मजकुराचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**गैरअर्जदार क्रमांक १ व ३ यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता ते गैरहजर त्याच्या वतीने साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.03.25 16:18:55 +0530

**अ. अ. शेख**

दिनांकः–२५.०३.२०२६

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 25-03-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 25-03-2026 |
| Order uploaded on | - | 25-03-2026 |